Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 11TH AUGUST 1898.

Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

## PART IX.—Marathi Acts, &c.

---

### जिवंत जनावरें बाहेरून आणण्याचें नियमन करण्यासाठीं अधिक चांगला ठराव करण्याबाबत आक्टाचा मसुदा.

ज्या जिवंत जनावरांना सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य विकार होण्याचा संभव असेल अशीं जिवंत जनावरें बाहेरून आणण्याचें नियमन करण्यासाठीं अधिक चांगला ठराव करणें योग्य आहे; त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) या आक्टास सन १८९८ चा जिवंत जनावरें बाहेरून आणण्याबाबत आक्ट असें ह्मणावें. — लहान सरनामा, स्थानिक व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. या आक्टांत, विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर,— — व्याख्या.

(अ) "सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य विकार" या संज्ञेंत गोंचडीची सांत गोळी, शेंवा, गर, खरूज आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे इंडिया ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून निर्दिष्ट करतील तसा दुसरा कोणताही रोग किंवा विकार यांचा समावेश होतो.

(ब) "जिवंत जनावरें" यांत, घोडे, गायी, उंटें, मेंढ्या आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे इंडिया ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून निर्दिष्ट करतील तसें दुसरें कोणतेंही जनावर यांचा समावेश होतो.

३. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे इंडिया ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य विकार होण्याचा संभव असलेलीं कोणतींहि जिवंत जनावरें आणि जिवंत जनावरांसंबंधी किंवा त्यांचा स्पर्श झाला असेल असा कोणताहि — जिवंत जनावरें बाहेरून आणण्याचें नियमन करण्याचा अधिकार.

चारा, विष्ठा, पसरलेला घांस, कपडालत्ता, हार्नेस अगर फिटिंग्स, ब्रिटिश हिंदुस्थानांत किंवा ब्रिटिश हिंदुस्थानांतलि कोणत्याही निर्दिष्ट केलेल्या जागेंत, जलमार्गानें किंवा खुष्कीनें, आणण्याचें किंवा घेऊन जाण्याचें, आपणास योग्य वाटेल त्या रीतीनें व तेथवर, नियमन करण्यास, इयत्ता करण्यास किंवा मनाई करण्यास मुखत्यार आहेत.

(२) पोट-कलम (१) याअन्वयें प्रसिद्ध केलेला जाहिरनामा, सन १८७८ च्या जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट, याच्या १९ व्या कलमाअन्वयें काढलेल्या जाहिरनाम्या-प्रमाणेंच अमलांत येईल असें समजावें ; आणि जलमार्गाचे कस्टम्ससंबंधी कायदा या-वरून जो कोणताहि पदार्थ बाहेरून आणण्याचें नियमन केलें असेल, इयत्ता केली असेल किंवा मनाई केली असेल त्या पदार्थाच्या संबंधानें व तो ज्या जहाजांत असेल त्या जहाजाच्या संबंधानें त्या त्या विद्यमान काळीं प्रत्येक बंदरांतील कस्टम्सच्या अमल-दारांस जे अधिकार असतील तेच अधिकार त्या अमलदारांना, जीं कोणतींहि जिवंत जनावरें अथवा पदार्थ बाहेरून आणण्याबाबत सदरहू जाहिरनामा काढला असेल त्या जिवंत जनावरांच्या अथवा पदार्थांच्या संबंधानें व तीं ज्या जहाजांत असतील त्या जहा-जाच्या संबंधानें आहेत असें समजावें; आणि त्याप्रमाणें, जलमार्गाचे कस्टम्ससंबंधी किंवा अशा कोणत्याहि पदार्थासंबंधी अगर जहाजासंबंधी त्या त्या विद्यमानकाळीं अम-लांत असलेले कायदे लागू होतील असें समजावें.

कानू करण्याचा स्थानिक सरकारास अधिकार.

४. (१) स्थानिक सरकार, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या निर्बंधास पात्र राहून, बाहेरून आणलेलीं जिवंत जनावरें आणि बाहेरून आणलेल्या जिवंत जनावरांसंबंधी, किंवा त्यांचा स्पर्श झाला असेल असा, चारा, विष्ठा, पसरलेला घांस, कपडालत्ता, हार्नेस किंवा फिटिंग्स अटकावून ठेवण्याबाबत, तपासून पहाण्याबाबत, त्यांतील रोगबीजाचा नाश करण्याबाबत किंवा त्यांचा नाश करण्याबाबत, आणि या संबंधानें स्थानिक सरकार ज्या अमलदारांस नेमील त्या अमलदारांच्या अधिकारांचें व कामांचें नियमन करण्याबाबत कानू करण्यास मुखत्यार आहे.

(२) या कलमाअन्वयें कोणतीहि कानू करतांना स्थानिक सरकार, तिचें उल्लं-घन करण्याबद्दल पराकाष्ठा एक हजार रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल असें फर्मावि-ण्यास मुखत्यार आहे.

या आक्टाअन्वयें काम करणाऱ्या मनुष्यांचें रक्षण.

५. जें कोणतेंहि कृत्य या आक्टाअन्वयें इमानेंइतबारें केलें असेल किंवा कराव-याचा इरादा असेल त्या कृत्याबद्दल कोणत्याहि मनुष्यावर कोणताहि दावा, फौजदारी काम किंवा इतर कायदेशीर काम चालणार नाहीं असें समजावें.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील बंदरांपैकीं एका बंदरांत आस्ट्रेलियाहून जहाजांतून भरून घोडे आले. त्यांना गोंचडीचा रोग, कीं जो गुरांच्या बाबतींत फारच प्राणघातक असून घोड्यासारख्या ज्या इतर जनावरांना तो मुळींच होत नाहीं त्यांनाहि लागण्याचा संभव असतो, तो रोग झाला होता असें शाबीत झालें; त्यामुळें सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य विकार होण्याचा संभव असणारीं जिवंत जनावरें बाहेरून आणूं न देण्याच्या संबंधानें सरकाराचे हल्लींचे कायदेशीर अधिकार काय आहेत हें पाहणें भाग पडलें. हे अधिकार अपुरे आहेत असें आढळून आल्यावरून, जरूर असलेले अधिकार घेण्याचें, मद्रास, मुंबई व बंगाल सरकारांच्या विचारानें ठरविलें आहे. हिंदुस्थानच्या बंदरांबाबत आक्ट (सन १८८९ चा १० वा) हा सुधारण्याच्या बदला एक स्वतंत्र आक्ट करणें व त्यांत हे अधिकार दाखल करणें इष्ट वाटलें आहे.

२. सदरहू मसुद्यांतील ठराव सामान्य स्वरूपाचे असून त्यांवरून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, सांसर्गिक व स्पर्शजन्य विकार होण्याचा संभव असलेलीं कोणतींहि जिवंत जनावरें खुष्कीनें किंवा जलमार्गानें ब्रिटिश हिंदुस्थानांत आणण्याचें नियमन करण्याचा, इयत्ता करण्याचा किंवा मनाई करण्याचा अधिकार दिला आहे. सदरहू मसुद्यावरून प्रत्येक बंदरांतील कस्टम्सच्या अमदारांना जरूरीचे अधिकार दिले आहेत, व अशीं जिवंत जनावरें अटकावून ठेवणें, तपासून पाहणें, त्यांच्यांतील रोगबीजाचा नाश करणें, किंवा त्यांचा नाश करणें याबाबत, आणि करण्यांत येतील त्या [illegible]ानूंअन्वयें नेमलेल्या अमलदारांच्या समजुतीसाठीं, कानू करण्याचा स्थानिक सरकारांस अखत्यार दिला आहे.

३. जीं जिवंत जनावरें बाहेरून आणण्याची मनाई केलेली असेल तीं जिवंत जनावरें ब्रिटिश हिंदुस्थानाच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत घेऊन जाण्याची मनाई करणें एवढें खेरीज करून देशांतील व्यापारांत ढवळाढवळ करण्याचा इरादा नाहीं.

(सही) सी. एम् रिवाझ्.

तारीख १३ माहे जुलै, सन १८९८.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Govenment.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल साहेब बहादुर यांनीं तारीख १५ माहे जुलै सन १८९८ रोजीं मंजूर केला, आणि तो सर्व लोकांस जाहिर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—

## सन १८९८ चा आक्ट ८ वा.

### सन १८९८ चा हिंदुस्थानचा कागदी नाण्याविषयींचा आक्ट सुधारण्याबावत आक्ट.

ज्या अर्थी सन १८९८ चा हिंदुस्थानचा कागदी नाण्याविषयींचा आक्ट सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :

लहान सरनामा व सुरुवात.

१. (१) या आक्टास सन १८९८ चा हिंदुस्थानचा कागदी नाण्याविषयींचा आक्ट सुधारण्याबावत आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

सन १८९८ च्या २ र्‍या आक्टाच्या १ ल्या कलमाची सुधारणूक.

२. सन १८९८ चा हिंदुस्थानचा कागदी नाण्याविषयीं आक्ट याच्या १ ल्या कलमाचें (३) रें पोट-कलम या आक्टावरून रद्द केलें असून त्याच्या ऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल केला आहे, ह्मणजे:

"(३) तो त्याच्या सुरुवातीपासून अडीच वर्षेपर्यंत अमलांत राहील."

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.